(२)



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): लातूर **P.S.**(ठाणे): चाकुर

   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0283 **Year** (वर्ष): 2024

   **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/06/2024 02:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

   1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

      **Time Period** (कालावधी):

      **Date From** (दिनांक पासून): 04/06/2024

      **Date To** ( दिनांक पर्यंत): 06/06/2024

      **Time From** (वेळेपासून): 00:00 बजे

      **Time To** (वेळेपर्यंत): 13:22 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

   **Date** (दिनांक ): 07/06/2024 **Time** (वेळ): 01:49 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

   **Entry No.** (नोंद क्र.): 002

   **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 07/06/2024 01:49 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

   1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

   दक्षिण, 3 किमी **Beat No.** (बिट क्र.):

   (b) **Address** (पत्ता): तहसील कार्यालय, चाकुर येथील ग, गेट नं 2 जवळ, चाकुर ,चाकुर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

   **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): स्वप्नील राम चव्हाण

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1999

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | यशवंतवाडी ता रेणापूर जि लातूर ,रेणापूर जि लातूर ,चाकुर,लातूर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | यशवंतवाडी ता रेणापूर जि लातूर ,रेणापूर जि लातूर ,चाकुर,लातूर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9561593537

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पांडुरंग दिगंबर दाडगे | | | 1. भाटसांगवी ,लातूर ,चाकुर, लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिलीप रघुत्तमराव मोरे | | | 1. पिंपळगाव ता जि परभणी,परभणी ,परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराच्या 40 नोटा | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 07/06/2024
फिर्याद

मी स्वप्नील राम चव्हाण, वय 25 वर्षे, व्यवसाय षेती रा. यषवंतवाडी ता.रेणापूर जि.लातूर
मो.नं. 9561593537
मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी दिनांक 03/06/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांची कार्यालयात जावून भेट घेवून एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितले. त्यावर त्यांनी मला दिनांक 04/06/2024 रोजी तहसील कार्यालय चाकूर जवळ सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले.

त्याप्रमाणे मी दिनांक 04/06/2024 रोजी सकाळी 09.40 वा. सुमारास वरील प्रमाणे संागितलेल्या ठिकाणी हजर आलो. तेथे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली हे खाजगी वाहनाने त्यांचे कर्मचारी व दोन पंचासह हजर होते. त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन माझे नाव, गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे
"मी वरीलप्रमाणे राहणार असुन षेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी माझे व माझे भावकीतील श्री अंगद षिवाजीराव चव्हाण व त्यांचे कुटुंबातील सदस्य यांचे षेतातील सामाईक बंधा-यावरील झाड तोडण्याच्या कारणावरून भांडण झाल्यामुळे श्री.अंगद षिवाजीराव चव्हाण यांचे फिर्यादीवरून माझे व माझे वडीलांविरूध्द पोलीस स्टेषन चाकूर येथे गुरनं.245/2024 कलम 323,324,504, 506,34 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. त्यावरून मी सुध्दा श्री.अंगद षिवाजीराव चव्हाण व त्यांचे नोतेवाईकांविरुध्द पोलीस स्टेषन चाकूर येथे गुरनं.246/2024 कलम 323,324,504,506,507,34 भादवि प्रमाणे क्रॉस गुन्हा नोंद केला आहे. वरील दोन्ही गुन्हयाचा तपास करणारे पोलीस अधीकारी व पोलीस कर्मचारी हे मला फोन करून गुन्हयामध्ये अटक न करण्यासाठी व गुन्हयात मदत करण्यासाठी म्हणून 25,000/-रू मागणी केली आहे.संबंधित पोलीसांनी मागणी केलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाल्याने व माझी लाच देण्याची इच्छा नसल्याने मी तक्रार देण्यासाठी आलो आहे. मी आजरोजी चाकूर पोलीस स्टेषन येथील पोलीस कर्मचारी व पोलीस अधीकारी यांची माझे कामाचे अनुशंगाने भेट घेणार आहे. सदर भेटीदरम्यान संबंधित पोलीस कर्मचारी व अधिकारी यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत माझेकडे लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्वतः अथवा इतरांमार्फत स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही होणेस विनंती आहे. संबंधीत पोलीस कर्मचारी व अधिकारी यांचेषी माझा कसलाही आर्थिक/पैषांचे देवाण-घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही व माझे त्यांचेषी कुठलेही वैर नाही.'' अषा आषयाची तक्रार दिली होती. मी दिलेल्या तक्रारीवर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

त्यानंतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पोलीस ठाणे चाकूर ता. चाकूर जि.लातूर येथील संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामासाठी लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच

सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांचे सुचनेवरून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 10ः29 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात अडकवुन दिले. त्यानंतर मी व पंच क. 01 यंचेवाड असे मिळुन पोलीस स्टेषन चाकूर जवळील संबंधित पोलीस कर्मचारी हे बसत असलेल्या रूमवर गेलो असता तेथे पांढ-या रंगाचा फुल षर्ट व काळया रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती ही पोलीस कर्मचारी दाडगे असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता मी माझ्ो वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष लोकसेवक दाडगे यांचेषी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान पोलीस दाडगे यांनी आधारकार्ड दे..... त्यावर मी म्हणालो... आधारकार्ड साहेबा आता ही पप्पासोबत......डॉक्युमेंट हायतं घरंच आणलो सापडलंच नाही मला पप्पासोबत हायतं डॉक्यूमेंट काकान पप्पा तिकडं गेलेत..... येणारेत..... त्यावर पोलीस कर्मचारी दाडगे म्हणाले... किती वेळ लागतय? त्यावर मी म्हणालो... मी केलता फोन येतो म्हणलेत लवकरचं....... आता काही अटक वगैरे काय होणार नाही ना साहेब? त्यावर पोलीस दाडगे म्हणाले... नाही रे..... तुमचं मिटवूण घ्यायचं म्हणलं ना...... तुम्हाला या म्हणलं तर.... असे म्हणुन चर्चा केली असता दरम्यान सदर ठिकाणी पोलीस अधिकारी मोरे हे आले असता मी पंचास ईषा-याने सदरचे इसम हे पोलीस अधीकारी मोरे साहेब असल्याचे सांगीतले असता मी मोरे साहेबांना नमस्ते मोरे साहेब..... असे म्हणाले असता त्यावर पोलीस अधिकारी मोरे साहेब यांनी नमस्ते नमस्ते काय चाललयं...... असे म्हणाले...त्यानंतर पोलीस दाडगे यांनी साहेबांच चहापाण्याचं काय ठरवलंय? ..... असे म्हणाले त्यावर मी साहेबांच चहापाण्याचं..... असे विचारणा केली असता....पोलीस कर्मचारी दाडगे यांनी किती वेळ लागणारय? असे विचारले त्यावर मी निघालेत त्यंनी मगाच एक तास झालं..... म्हणालो त्यावर पोलीस दाडगे म्हणाले... त्यच आधारकार्ड आणलं असत म्हणजे समदी टाकून काय घंटाबर..... काढून आणून दे...... असे म्हणाले असता त्यावर मी पप्पाचं का?.... बर आणतो जावून...... असे म्हणून मी व पंच क्रमांक 1 यंचेवाड असे निघून बाहेर येवुन सापळा पथकाच्या वाहनाजवळ 12ः29 वाजताचे सुमारास गेलो असता पोकॉ कच्छवे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 यंचेवाड यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व संबंधित पोलीस अधीकारी व कर्मचारी यांच्यात काय बोलणे झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 यंचेवाड यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही सर्वानी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व संबंधित पोलीस कर्मचारी यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 यंचेवाड यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री केली. वरील संभाशणावरून पोलीस कर्मचारी दाडगे यांनी सुरूवातीस माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे साहेबांच चहापाण्याचं काय ठरलंय? असे विचारणा करून माझे पप्पाचं आधारकार्ड आणून देण्यास सांगितलेने परंतु संभाशणादरम्यान मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेचा निष्चीत बोध होत नसल्याने व आधार कार्ड काढून आणून देतो असे पोलीस कर्मचारी दाडगे यांना म्हणालो असल्याने सापळा अधिकारी, पंच व मी असे सर्वानुमते परत एक वेळेस लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 12.33 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात अडकावुन मला व पंच क. 01 यंचेवाड यांना परत पोलीस स्टेषन चाकूर जवळील संबंधित पोलीस कर्मचारी बसत असलेल्या रूमवर जावून पोलीस दाडगे यांची भेट घेण्यासाठी जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 यंचेवाड असे संबंधित पोलीस दाडगे यांचे रूमवर जावुन पोलीस दाडगे यांची भेट घेवुन माझ्ो वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान पोलीस दाडगे मला म्हणाले... बाकीचं कहाय मग? ...त्यावर मी म्हणालो... अं.... त्यावर पोलीस दाडगे म्हणाले... बाकीच कहाय? त्यावर मी म्हणालो... बाकी तुम्ही जी म्हणचाल तीचन आता..... आता तुमच्याच मनावर हाय साहेब...... जरा काही कमी जास्त करा.... अं...आज वेळ काढून त्यच्यामुळंच आलो सर...... समदचं क्लिअर करावं म्हणलं साहेब बी इकडंच आणबी तीकडंच असं होवू लालय...... हं.... हं..... किती आणू? तरी..... साहेबांन म्हणले होते.... काही बघा कमी जास्त..... तुम्ही सांगा मग मी बी येतो तयारीनं....... त्यावर पोलीस दाडगे म्हणाले... तयारी केलाय का?.... त्यावर मी म्हणालो... आ..... झाल्याय..... समदी ओ..... सांगा तुम्ही सांगितलं म्हणजे ही होतयं साहेब तेवढं.... अं..... त्यावर पोलीस दाडगे म्हणाले... ह्याच्यावर लिहं..... असे म्हणुन मला कागदावर लिहण्यास सांगीतले असता मी म्हणालो... ह्याच्यावर ....... यावर पोलीस दाडगे म्हणाले... लिहं म्हणलं.... सांगतो मी साहेबांला..... म्हणाले असता मी काय लिहायचं मला..... असे विचारणा केली असता पोलीस दाडगे म्हणाले... बस तिथं बस...... साहेबा...... काय सांगितल होत..... त्यानंतर मी साहेबांन पंचवीस हजार म्हणले होते...हजार..... असे म्हणालो असता पोलीस दाडगे म्हणाले... साहेबाला सांगतो ना..... लिहं.... लिह म्हणलं.... कच्चा कागद..... साहेब काही म्हणालते?... असे

विचारले असता मी साहेब पंचवीस म्हणालते..... आता एवढं काहीतरी तुम्ही सहकार्य कमी जास्त..... असे म्हणालो त्यावर पोलीस कर्मचारी दाडगे म्हणाले... करतो रे..... त्यावर मी किती द्यावं सांगा तुम....... तुम्ही सांगीतलो म्हणजे मी आणतो तेवढं म्हणून म्हणलालतो साहेब.... असे म्हणाले असता पोलीस दाडगे यांनी हाताचे ईषा-याने कमी कर एवढे...... असे म्हणुन पाच हजार कमी करण्यास हाताच्या इषा-याने सांगीतले त्यावर मी पोलीस दाडगे यांना पाच हजार कमी करायचे? असे विचारणा केली असता पोलीस दाडगे यांनी हं....... असे म्हणाले त्यावर मी लई होतेत साहेब तेवढे.... असे म्हणालो असता पोलीस दाडगे यांनी आर तीच्या बायला निहून सन्या..... बोललो साहेबाला...... असे म्हणाले त्यावर मी हं.... हं..... बघा तुमच्या मनानं कहाय ती.... ऑनलाईनला हायत पाच हजार काढून आणतो लगेच...... देतो तेवढे....... असे म्हणालो असता पोलीस दाडगे म्हणाले... तसं नसतयं..... त्यावर मी पप्पा येवजेकोणा तेवढं देतो ओ साहेब.... म्हणून म्हणलालतो..... साहेबाला भेटावं...... मोरे साहेबांला.......मग कसं करावं साहेब आता?... म्हणालो त्यावर पोलीस दाडगे यांनी पटकुण्या बघायचं इथंच कहाय ती....असे म्हणाले असता तेवढयात पोलीस अधिकारी मोरे साहेब आले असता मी मोरे साहेब..... असे म्हणालो असता मोरे साहेबांनी अं...... असे म्हणाले त्यावर मी त्या दिवषी तुम्ही म्हणलो होतो पंचवीस...... असे म्हणालो असता मोरे साहेब यांनी हं..... म्हणाले त्यावर मी म्हणालो साहेब म... काही कमी जास्त कराय लावा..... परिस्थीती नाही ओ...... तेवढी माझी साहेब.... असे म्हणालो असता मोरे साहेब यांनी त्यंला पाच दे....... मला काही घेणं...... त्यला..... त्यला मी नाही म्हणु षकत... तु तुझ्या लेवलला त्यला पाच दिलं तर मला काही घेणं नाही नाही मला काही..... असे म्हणाले त्यावर मी येवू का साहेब? असे म्हणालो असता मोरे साहेब यांनी हो... जावा...... असे म्हणाले असता मी पोलीस दाडगे यांना कसं करू सांगा साहेब तुमचं? असे विचारणा केली असता पोलीस कर्मचारी दाडगे यांनी कसं करायचयं? देवं लागतयं सर्वांना...... नसतंय...... असे म्हणालो असता मी बघा पटकण येतो जावून.... पाच हजार रूपये देतो बाकी पुन्हा प्रोसेस करताना काही देतो आणखी..... देतो काय आज काय.....अं...... असे म्हणाालो त्यावर पोलीस दाडगे यांनी चल.....असे म्हणाले त्यावर मी सकाळीच येवू का मग साहेब.... वडलाला घेवून......म्हणालो त्यावर पोलीस दाडगे यांनी फोन करतो..... अं...... असे म्हणाले असता मी हो..... हो...... असे म्हणुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने मी त्यांना मोरे साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे व पोलीस कर्मचारी दाडगे यांच्या म्हणण्याप्रमाणे तडजोडीअंती 20,000/-रूपये आणुन देतो असे सांगीतल्याने आम्ही पोलीस कर्मचारी दाडगे व पोलीस अधिकारी मोरे यांचेवर सर्वानुमते त्यांचे विरुध्द 20,000/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. परंतु संबंधित पोलीस दाडगे यांनी फोन करतो..... असे सांगितले असल्याने सर्वानुमते पुढील सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगित करुन पुढील कार्यवाही ही पोलीस कर्मचारी दाडगे यांचा फोन आल्यानंतर करण्याचे ठरवुन पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी सर्वांना गोपनीयतेबाबत सुचना दिल्या व मला पोलीस कर्मचारी दाडगे यांचा फोन आल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयात येण्यास सांगीतले.

त्यानंतर आज दिनांक 06/06/2024 रोजी संबंधित पोलीस कर्मचारी दाडगे यांनी आज 11:00 वाजता पोस्टेला येणेबाबत सांगितले असल्याने मी पुढील सापळा कार्यवाहीकरीता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे हजर आलो असता सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली यांनी पंच व सापळा पथकास बोलावुन घेवुन मला पोलीस दाडगे यंाना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी संबंधित पोलीस दाडगे यांनी माझेकडे दि.04/06/2024 रोजी भेटीदरम्यान तडजोडीअंती मागणी केल्याप्रमाणे एकुण 20,000/- रू. ज्यामध्ये 500/-रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा असे एकुण 20,000/-रुपये समक्ष हजर केल्या. त्यावेळी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1759 कोंडरे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर डोळयावरचा चष्मा काढून हातात धरणेबाबतचा सुनियोजीत ईषारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकॉर्डर 12:12 वा. चालु करुन माझ्या गळयात आडकावुन दिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 यंचेवाड असे मिळुन संबधित पोलीस कर्मचारी बसत असलेल्या रुमवर जावुन पोलीस दाडगे यांची भेट घेतली असता पोलीस दाडगे यांनी माझे कामाच्या अनुशंगाने माझेषी चर्चा करून मला तहसील कार्यालय, चाकुर येथे मोटारसायकलवर घेवुन गेले असता मी माझेसोबत असलेले पंच क्र. 01 यंचेवाड यांना माझे पाठीमागे येण्यास ईषा-याने सांगीतले असता पंच क्र. 1 यंचेवाड हे माझे पाठीमागे माझे मोटारसायकलवर तहसील कार्यालय, चाकुर येथे आले. तहसील कार्यालय चाकुर येथे आल्यांनतर काही वेळाने संबंधीत पोलीस दाडगे यांनी मला किती आणलास तु... असे विचारणा केली असता मी तुम्ही जेवढे बोललो तेवढे आणलाव साहेब.... असे म्हणालो त्यावर पोलीस दाडगे यांनी हं... असे म्हणुन हाताच्या ईषा-याने पोलीस दाडगे

यांचे जवळ असलेल्या कॅरीबॅगमध्ये सदर लाचेची रक्कम टाकण्यास सांगीतले असता मी पोलीस दाडगे यांना हयच्याद दे टाकुन... असे म्हणाले त्यावर मी हया बॅगमधी... असे म्हणालो असता पोलीस दाडगे यांनी ह... म्हणाले त्यावर मी मोजुन घेणारनाव साहेब....म्हणालो असता त्यावर पोलीस दाडगे यांनी ए दे.... असे म्हणाले त्यावर मी 500/-रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा असे एकुण 20,000/-रुपये पोलीस कर्मचारी दाडगे यांचे समोर धरून साईडला टाकु का इथच टाकु कॅरीबॅगमधी... डिक्कीत ठेवु का? असे विचारले असता पोलीस दाडगे यांनी हं...पुर्ण हायतन् हे... पुर्णच टाकलेत न्... असे म्हणाले त्यावर मी हं पुर्ण हायत.. काही अडचण नाही... तुम्ही जेवढे म्हणला होतात तेवढे वीस हजार हायत.... असे म्हणुन सदर लाचेची रक्कम रक्कम 20,000/-रू. पोलीस दाडगे यांचे मोटारसायकलच्या डिक्कीमध्ये ठेवली असता सदर लाचेची रक्कम दाडगे यांनी माझेकडुन 13.22 वाजण्याच्या सुमारास पंचासमक्ष सदरची लाचेची रक्कम स्विकारली. त्यानंतर मी नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. त्यांनतर लगेच पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे पंच क्र. 02 मोरे व सापळा पथकातील सदस्यासह सदर ठिकाणी आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 1 यंचेवाड यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 यंचेवाड यांनी समोर फिकट तपकीरी रंगाचा फुल बाहयाचा षर्ट व नेव्हीब्ल्यु रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे पोलीस कर्मचारी दाडगे असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर स्विकारुन कॅरीबॅगमध्ये ठेवण्यास सांगुन पोलीस दाडगे यांचे मोटारसायकलच्या डिक्कीत ठेवण्यास सांगीतले असल्याचे सांगितले. मी वर सांगीतलेल्या हकीकती प्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 यंचेवाड यांनी सांगीतली. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र पोलीस कर्मचारी दाडगे यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव पांडुरंग दिगंबर दाडगे, वय 43 वर्शे, पद पोलीस हवालदार ब.नं. 1545, वर्ग-3, नेमणुक पोलीस स्टेषन चाकुर जि. लातूर, रा. नाथ नगर, विवेकानंद चौक, लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 2 मोरे यांचे हस्ते पोलीस कर्मचारी दाडगे यांच्या जवळील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 यंचेवाड यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले. त्यानंतर पोलीस कर्मचारी दाडगे यांना ताब्यात घेवुन पोलीस अधिकारी मोरे हे पोलीस स्टेषन चाकुर येथे हजर असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे षासकीय पंच व सापळा पथकासह पोलीस स्टेषन चाकुर येथे जावुन पोलीस अधिकारी मोरे यांना सदर घटनेबाबत माहिती देवुन त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस कर्मचारी दाडगे यांचेकडुन तक्रारदार यांचे विरूध्द दाखल गुन्हयाचे कागदपत्रे ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन पुढील कार्यवाही करणे करीता पोलीस कर्मचारी दाडगे व पोलीस अधिकारी मोरे यांना सोबत घेवून घटनास्थळावरुन रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली.

तरी यातील लोकसेवक पांडुरंग दिगंबर दाडगे, वय 43 वर्शे, पद पोलीस हवालदार ब.नं. 1545, वर्ग-3, नेमणुक पोलीस स्टेषन चाकुर जि. लातूर, रा. नाथ नगर, विवेकानंद चौक, लातूर यांनी माझे व माझे भावकीतील श्री अंगद षिवाजीराव चव्हाण व त्यांचे कुटुंबातील सदस्य यांचे षेतातील सामाईक बंधा-यावरील झाड तोडण्याच्या कारणावरुन भांडण झाल्याने माझे व माझे वडीलांविरूध्द पोलीस स्टेषन चाकूर येथे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयामध्ये अटक न करण्यासाठी व गुन्हयात मदत करण्यासाठी म्हणून पोलीस कर्मचारी दाडगे यांनी 25,000/-रू मागणी करून तडजोडीअंती 20,000/-रू. घेण्याचे मान्य करून 20,000/-रू. लाचेची रक्कम आज दिनांक 06/06/2024 रोजी तहसील कार्यालय, चाकुर येथील गेट नं. 2 जवळ 13ः22 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे. व दिलीप रघुत्तमराव मोरे वय 33 वर्शे, पद पोलीस उपनिरीक्षक नेमणुक पोलीस स्टेषन चाकुर जि. लातूर, रा. संदीम स्वामी यांचे घरी, चाकुर पोलीस स्टेषनचे पाठीमागे चाकुर यांनी सदर लाचेची रक्कम पोलीस कर्मचारी दाडगे यांना देण्यास सांगुन प्रोत्साहन दिले म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेषीर तक्रार आहे.

मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोह 65 आलुरे यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रिंट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

(5)



13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dattatray shivajirao nikam(SI (Sub-Inspector)) / 15101000402dsnm8201s

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dattatray shivajirao

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): 15101000402dsnm820

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन, चाकुर